# नवरात्र महोत्सव

अश्विन शुद्ध प्रतिपदेला नवरात्र महोत्सव सगळ्या भारतभर उत्साहाने साजरा केला जातो. खरं तर ज्येष्ठापासून व्रत-वैकल्याला सुरुवात होते. आषाढ आणि श्रावण हे तर सणांचे आणि व्रत-वैकल्यांचे महिने. आषाढी एकादशी ते कार्तिकी एकादशीपर्यंत चातुर्मास पाळला जातो. आषाढ आणि श्रावणातले सणवार एक उत्साह आणि सकारात्मक वातावरण तयार करतात. त्यात गणपतीचे आगमन उत्साहात होते आणि हा गणेशोत्सव आनंदाने व उत्साहाने पार पाडतो. त्यानंतर येणारा 'पितृ पंधरवडा' हा, श्राद्ध विधी, पितरांचे विधी आणि इतर अपसव्य विधी इ. गोष्टीने अगदी व्यस्त जातो. या काळात शुभकार्य होतच नाही.

ह्या पितृ पंधरवड्याची एक आख्यायिका आहे. फार पूर्वी चाणक्यांच्या काळात आजच्या सारखीच सरकारी कामाची पद्धत होती. काही लोक कामात चुकारपणा करत. सुट्टी घेण्यासाठी हे कर्मचारी काही वेळा वारंवार पितरांच्या विधीचे कारण पुढे करत गैरहजर राहत असत. त्या गैरहजेरीच्या सबबीवर चाणक्यांनी एक नामी युक्ती शोधली. श्रावण आणि भाद्रपदातील व्रतवैकल्याचा धामधुमीनंतर, कार्तिक मासारंभाच्या आधीचा पंधरवाडा ह्या पितरांच्या विधी साठी राखून ठेवला आणि फतवा काढला की सगळ्या सरकारी कर्मचाऱ्यांनी ह्या कालावधीत पितरांचे विधी आटोपून घ्यावेत. हाच तो 'पितृ पंधरवडा'.

ह्या पितृ पंधरवड्याच्या समाप्तीनंतर अश्विन शुद्ध प्रतिपदेला अंबाबाईची प्रतिष्ठापना होते. हा नवरात्र महोत्सव हा नऊ रात्रींचा जागर असतो. आपल्या शास्त्रात नऊ संख्येला खूप महत्व आहे. आपले पत्रिकेतील ग्रह सुद्धा नऊ आहेत. नाथपंथियांत नऊ नाथ आहेत. अनमोल रत्ने जसे हिरा, माणिक, मोती, इंद्रनील, पाचू, प्रवाळ, गोमेद, पुष्कराज आणि तोरमल्ली ही बहुमूल्य रत्ने नऊच. भावनेचा आविष्कार असलेले  आनंद, दुःख, भय, कारुण्य, अद्भुत, हास्य,  शृंगार, बीभत्स आणि शांत असे नऊ रस. अकबराच्या दरबारात सुद्धा राज्यकारभार करणारी 'नवरत्ने' होती. विक्रमादित्यांच्या सभेतील, धन्वंतरी, क्षपणक, अमरसिंह, शंकू, वेताळभट्ट, घटखर्पर, कालिदास, वराहमिहीर आणि वररूची ही 'नवरत्ने' होती. त्यामुळे ह्या नवदुर्गांचा नऊ रात्री जागर करण्याचा हा नवरात्र महोत्सव ह्याला विशेष महत्त्व आहे.

ह्या नवरात्रात घरोघरी देवीची प्रतिष्ठापना होते. घरोघरी घट बसतात. ज्या मातीत 'घट' बसवतात, त्या मातीत पेरलेल्या गव्हाला अंकुर फुटतात. प्रत्येक घरात कुलस्वामिनी देवतेचा तांदळा असतो आणि 'टाक' असतात. हे घट बसल्यावर ह्या घटाभोवती गव्हाचे हिरवे तृणांकुर वाढतात. त्यात

प्रत्येक दिवशी झेंडूच्या फुलांची एक माळ अर्पण केली जाते आणि मग फुलोरा अर्पण करतात. असे हे मनमोहक घटाचे दृश्य असते. रात्री नित्यनियमाने आरतीचा मोठा कार्यक्रम असतो. घरातील लहानथोर 'माहुरगडावरी तुझा वास', 'उदो बोला उदो अंबाबाईचा उदो' तसेच 'आई भवानी तुझ्या कृपेने घाली गोंधळा हो' अश्या आरत्यांनी, माहूरची रेणुकामाता, कोल्हापूरची अंबाबाई आणि तुळजापूरच्या भवानी माता या मुख्य तीन मुख्य शक्ती पिठाचा जणू जयजयकार होत असतो.

ह्या आदिमायेची नऊ रूपे, त्यातील प्रमुख ज्ञानदीपाचे प्रतीक असलेली सरस्वती देवी, समृद्धीचे प्रतीक असलेली माता लक्ष्मी, उग्ररूपाचे प्रतिनिधित्व करणारी काली माता आणि महिषासुर मर्दिनी, आदिमायेची आणखी एक रूप म्हणजे पार्वती माता.

नवरात्र महोत्सवातील आदिमायेचे निष्पाप रूप म्हणजे 'कुमारिका'. आजही नवरात्रात घरोघरी कुमारिकेचे पूजन केले जाते. तिची पाद्यपूजा करून विधिवत पूजन केले जाते.

आसाममध्ये गोहातीला कामाख्या देवीचे मोठे सुंदर मंदिर आहे. ह्या मंदिरात स्त्रियांना मोठा मान दिला जातो. साधारणतः भारतातील मंदिरात पुरुषप्रधान संस्कृती आढळते, मात्र कामाख्या मंदिरात स्त्रियांना अग्रक्रम आणि विशेष मान दिला जातो. कामाख्या मंदिराच्या परिसरात एक तलाव आहे, त्या तलावात फक्त स्त्रियांना प्रवेश दिला जातो. तेथे पुरुषांना प्रवेश निषिद्ध आहे. ह्याच कामाख्या मंदिरात कुमारिका पूजन हा मोठा विधी आहे. स्त्री जातीचा हा गौरव खूप कमी ठिकाणी पाहायला मिळतो.

नवरात्र महोत्सव हा भारतात ठिकठिकाणी वेगवेगळ्या रीतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रात घटस्थापना करून, देवींच्या विविध आरत्यांनी, देवीचा 'गोंधळ' साजरा करून महोत्सव साजरा होतो तर राजस्थान आणि गुजरात मध्ये 'गरबा' खेळून नवरात्र जागविली जाते. देवीच्या घटाभोवती फेर ठरवून तालबद्ध संगीताच्या पार्श्वभूमीवर लयबद्ध नृत्याने 'गरबा' खेळून सण साजरा करतात. बंगालमध्ये 'दुर्गापूजा' हा मोठा सण आहे. दुर्गापूजेत 'धुनी नृत्य' आणि 'सिंदूरखेला' असा नवरात्र उत्सवाचा घटक असतो. दक्षिणेकडे मात्र परंपरागत पद्धतीने मंत्रपठाणाद्वारे आणि यज्ञ आणि होम अश्या रीतीने नवरात्र महोत्सव साजरा केला जातो.

नवरात्र महोत्सव हा फक्त आदिमायेचा जयजयकार नसून ही आदिमाया आपल्याला ज्या विविध रुपात दैनंदिन आयुष्यात भेटते त्या समस्त स्त्री जातीचा जणू आदर राखण्याचा आणि सन्मान करण्याचे जणू प्रतीक आहे. ही आदिमाया आपणास आयुष्यात विविध नात्यात आणि रुपात भेटत असते आणि आपली साथसोबत करत असते. आपल्या जीवनात आनंद, उत्साह आणि मांगल्याची

निर्मिती करत असते. प्रथम ती 'आईच्या' रुपात भेटते आणि प्रेम, वात्सल्य देते. 'मावशी' आणि 'आत्याच्या' रूपाने लाड, प्रेम करते. 'आजीच्या' रुपात दुधावरच्या साईप्रमाणे दाट प्रेम करते. 'पत्नीच्या' रुपात प्रत्येक सुखदुःखात साथ सोबत करते आणि आपला वंश वाढवते पण मुलांवर उत्तम संस्कार करते. 'बहिणीच्या' रुपात आनंद, माया देत असताना, सदैव पाठीशी उभी असते. 'मुलीच्या' रुपात घरात आनंद, उत्साह आणते. लक्ष्मीच्या पावलाने ती 'सुनेच्या' रुपात घराला नवचैतन्य प्राप्त करून देते. 'नातीच्या' रूपाने अलगद प्रवेश करत घराला घरपण आणते, जणू आयुष्य परिपूर्ण करते. अश्या या नऊ रूपांतील नवदुर्गा आपल्या अवतीभवती वावरत असतात.

असं म्हणतात,
"ज्याला बाईतली ताई कळाली, तो 'मुक्ताईचा' 'ज्ञाना' झाला ।
ज्याला बाईतली 'पत्नी' कळाली, तो 'सीतेचा' पुरुषोत्तम राम झाला ।
ज्याला बाईतली 'आई' कळाली, तो 'जिजाऊचा' 'शिवबा' झाला ।
ज्याला बाईतली 'सून' कळाली, ते 'येसूबाईंचे' ते 'छत्रपती शिवाजी महाराज' झाले ।
ज्याला बाईतली सोज्वळ 'सखी' कळाली, तो 'राधेचा' 'शाम' झाला ।
ज्याला बाईतल्या 'लेकीचे' जन्मजात गुण कळाले, तो 'गानकोकीळा लतेचा' 'दीनानाथ' झाला.

स्त्री ही एक ऊर्जा आहे. ते आदिमायेचे रूप आहे, हे जेव्हा कळते तेव्हा तिचा आदर सन्मान आणि तिच्या क्षमतेचा परिपूर्ण वापर केला जातो. जेथे स्त्रीचा आदर केला जातो तेथे जणू देवतेचा वास असतो.
'यत्र नार्यस्तू पूज्य ते।
रमते तत्र देवतः ।।'

ह्या आदिमाया, दुर्गा कधी लेफ्टनंट जनरल 'माधवी कानिटकर' ह्यांच्या रुपात भेटतात तर कधी क्रांतीज्योती 'सावित्रीबाईंच्या' रुपात स्त्री शिक्षणाचा प्रसार करतात. कधी प्रियदर्शनी 'इंदिरा गांधी' दुर्गेच्या रुपात दिसतात. कधी गानतपस्वी 'किशोरीताई अमोणकारां'च्या रुपाने स्वरात चिंब भिजवतात. कधी 'इंद्रा नुयीच्या' रुपात पेप्सी सारख्या बहुराष्ट्रीय कंपनीचे यशस्वी नेतृत्व करतात. कधी आपल्या सौंदर्याने आणि अभिनयाने 'माधुरीच्या' रुपात प्रेक्षकांवर अधिराज्य गाजवतात. तर कधी परंपरागत पुरुषी अधिराज्य असलेल्या क्रिकेट सारख्या सांघिक खेळात 'मिताली राजच्या' रूपाने आपला ठसा उमटवतात. कधी आपल्या संपत्तीचा उत्तम सामाजिक कार्यासाठी विनियोग व्हावा म्हणून इन्फोसिस फौंडेशनच्या रूपाने समाज कार्य करणाऱ्या 'सुधा मूर्ती' च्या रूपाने आढळतात. कधी थोर विदुषी 'दुर्गा भागवत' ह्यांच्या रुपात थोर साहित्याची निर्मिती करतात. अश्या अनेक नवदुर्गा आपल्या कार्यशैलीने समाजात वेगळा ठसा निर्माण करतात.

नवरात्र महोत्सव हा देवीच्या जागारापुरता मर्यादित न राहता, अश्या अनेक दुर्गा ज्या समाजात वावरत आपले योगदान देत असतात. मग त्या डॉक्टर, परिचारिका, शिक्षिका, पोलीस, अभियंता, वास्तूशास्त्रज्ञ, सफाई कामगार, घरकाम करणाऱ्या स्त्रिया, गृहिणी इ. रुपांत भेटतात. त्या समस्त स्त्री जातीचा आदर, सन्मान करणे आणि त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करणे हेच खरे नवरात्र महोत्सवाचे प्रतीक मानायला हवे, ही स्त्री कुठल्याही रुपात असली तरी ती मायेचे, सामर्थ्याचे प्रतीक आहे.

**-मनोज कुरुंभटी**